कार्यालय,विभागीय सहनिबंधक,सहकारी संस्था,लातूर
मध्यवर्ती प्रशासकीय इमारत,दुसरा मजला लातूर
फोन नं.०२३८२-२५५१३५ फॅक्स नं.०२३८२-२४३७९९ ई-मेल -djr_ltr@redifmail.com

## Pro-active disclosure under Section ४ (१) (b) of the Right to information Act, २००५

### १.The particulars of organization, functions and duties
### ( रचना, कार्य व कर्तव्ये यांचा तपशिल )

विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, लातूर विभाग लातूर या विभागाची निर्मीती मार्च २००१ मध्ये झाली असून लातूर विभागात लातूर, उस्मानाबाद, बीड व नांदेड या चार जिल्हयाचा समावेश आहे.

सहकारी अर्थ व्यवस्था ग्रामीण जनता, आर्थिक व सामाजिक पीडीत शोषीतांच्या उत्कर्षाचे आशा स्थान म्हणून मान्यता पावलेली असून तिने गेल्या शतकामध्ये सर्व व्यापी स्वरुप प्राप्त केलेले आहे. व्यक्तीच्या ग्रामीण शेती विषयक गरजांपासून ते ग्राहक वस्तू वितरण, औद्योगिक प्रक्रिया इतकेच नव्हे तर सहकारी रुग्णालयांपर्यत लक्षणीय वाटचाल झाली आहे.

### २.The powers and duties of officers and employees
### ( अधिकारी व कर्मचारी यांचे अधिकार व कर्तव्ये)

**विभागीय सहनिबंधक यांच्या जबाबदाऱ्या**

१. सहकारी संस्था व उपविधी नोंदणी (कलम ९ ) आणि त्यांच्या सुधारणा (कलम १३ व कलम १४) यांची नोंदणी करणे आणि नोंदणीचे प्रमाणपत्र देणे (कलम १०)
२. सदस्य होऊ पाहणारा इसम शेतकरी आहे किंवा नाही किंवा त्यांचे रहाण्याचे ठिकाण संस्थेच्या कार्यक्षेत्रात आहे किंवा नाही याचा निर्णय देणे (कलम ११)
३. संस्थांचे वर्गीकरण करणे आणि त्यांची यादी प्रसिध्द करणे (कलम १२) (३ अ) उपविधींची सुधारणा नोंदणी नाकारणे (कलम १३) आणि उपविधी सुधारणा करण्याचा निर्देश देणे (कलम १४)
४. संस्थेच्या नांव बदलास मंजूरी देणे (कलम १५)
५. संस्थांचे एकीकरण, हस्तांतर, विभागणी किंवा रुपातंर यास मंजूरी देणे (कलम १७)
६. संस्थांचे एकीकरण किंवा पुनर्रचना करण्याचा निर्देश देणे (कलम १८)
७. संस्थेची पुनर्रचना करण्याचा आदेश देणे (कलम १९)
८. संस्थांच्या भागीदारीस परवानगी देणे (कलम २०)
९. संस्थेची नोंदणी रद्य करणे (कलम २१)
१०. संस्थेचा सदस्य म्हणून दाखल करण्यास नकार देण्यात आलेल्या व्यक्तीचे अपील निकाली काढणे (कलम २३)
११. सदस्याची संस्थेतून हकालपट्टी करण्याचे ठरावास मान्यता देणे किंवा सदर सदस्यास पुन: सदस्य म्हणुन दाखल करुन घेण्यास संमती देणे (कलम ३५)
१२. दुस-या संस्थेस कर्ज देण्यास संमती देणे (कलम ४४)
१३. संस्थेचा निधी विशिष्ठ रितीने गुंतविण्याबद्दल आदेश देणे (कलम ७०)
१४. एखाद्या संस्थेच्या किंवा संस्था वर्गाच्या समितीवरील सदस्यांची कमाल संख्या निश्चित करणे (कलम ७३)
१५. मुदत संपण्यापूर्वी समितीने निवडणूक न घेतल्यास निबंधक स्वत:च संस्थेचे व्यवस्थापन आपल्याकडे घेता येईल किंवा प्रशासकाची नेमणुक करता येईल (कलम ७३ आय)

१६. संस्थेचा किंवा संस्था वर्गाचा मुख्य कार्यकारी अधिकारी, वित्त अधिकारी, व्यवस्थापक, सचिव, लेखापाल व इतर कोणताही पदाधिकारी यांच्या नियुक्तीसाठी लागणा-या अर्हता आणि यांच्या वित्तलब्धी व वेतनेत्तर परिलब्धी निर्धारीत करणे (कलम ७४)

१७. वार्षिक सर्व साधारण सभा बोलविण्यात किंवा तिच्या पूढे ताळेबंद वगैरे ठेवण्याच्या बाबतीत कसूर करणारा (कलम ७५) किंवा विशेष साधारण सभा बोलाविण्यांत कसूर करणारा (कलम ७६) अधिकारी किंवा समितीचा सदस्य यांस निवडणुकीस अपात्र ठरविणे किंवा असा अधिकारी संस्थेचा नोकर असल्यास त्यास रु.१००/- पर्यत दंड करणे.

१८. वार्षिक सर्व साधारण सभा बोलविण्यासाठी मुदत वाढविणे किंवा अशी सभा बोलविण्याचा एखाद्या इसमास अधिकार देणे (कलम ७५)

१९. संस्थेची विशेष सर्व साधारण सभा बोलविणे किंवा ती बोलविण्याचा एखाद्या इसमास अधिकार देणे (कलम ७६)

२०. समितीच्या, नवीन समितीच्या सदस्यांची किंवा प्रशासकाची नेमणुक करणे किंवा बदलणे (कलम ७७ अ)

२१. समिती काढून टाकणे, नवीन समिती/प्रशासक नेमणे, सभासद काढून टाकणे व दुसरा नेमणे (कलम ७८)

२२. संस्थेस बंधनकारक असतील अशी कामे करवून घेणे आणि त्या कसूर करणा-यास दंड करणे (कलम ७९)

२३. विनियम तयार करण्यासाठी निर्देश देणे (कलम ७९ अ अ)

२४. संस्थेचे दप्तर आणि मिळकतीचा ताबा घेणे (कलम ८०)

२५. संस्थेचे दरवर्षी हिशेब तपासणे/तपासून घेणे (कलम ८१) व हिशेब दोष सुधारण्याचा आदेश देणे (कलम ८२)

२६. संस्थेची रचना, कामकाज आणि आर्थिक स्थिती यासंबंधी चौकशी करणे (कलम ८३)

२७. चौकशी किंवा तपासणी याचे खर्चाबद्दल हुकूम करणे (कलम ८५) आणि ती वसूल करणे (कलम ८६)

२८. संस्थेची पुस्तके तपासणे किंवा ती तपासून घेणे (कलम ८४)

२९. चौकशी अथवा तपासणीत उघडकीस आलेले दोष संस्थेच्या निदर्शनास आणणे आणि त्यासाठी उपाययोजना करण्याविषयी निर्देश देणे ( कलम ८७)

३०. अपराधी, प्रवर्तक वगैरे विरुध्द नुकसानी आकरणे (कलम ८८)

३१. साक्षीसाठी हजर राहणे करीता किंवा कोणताही दस्तऐवज हजर करण्यास भाग पाडणे (कलम ८९)

३२. संस्थेच्या कारभाराचे निरिक्षण करणे (कलम ८९ अ)

३३. विविक्षित सहकारी संस्थांच्या देय थकबाकीची जमीन महसूल थकबाकी प्रमाणे वसूली करणे (कलम १०१)

३४. सहकारी संस्थेचे व्यवहार बंद करणे (कलम १०२) व ऋणपरिशोधकांची नेमणुक करणे (कलम १०३)

**३.The procedure followed in the decision making process, including channels of supervision and accountability**
**( निर्णय घेण्याच्या प्रक्रियेत अनुसरण्यात येणारी कार्यपध्दती, तसेच पर्यवेक्षण आणि उत्तरदायीत्व प्रणाली)**

सहकार खात्याची क्षेत्रीय रचना

प्रधान सचिव (सहकार) (मंत्रालय स्तर)

सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे (राज्यस्तर मुख्यालय)

| | |
|---|---|
| विभागीय सहनिबंधक (प्रशासन) (विभाग स्तर) | विभागीय सहनिबंधक (लेखापरिक्षण) (विभाग स्तर) |
| जिल्हा उपनिबंधक (जिल्हास्तर) | जिल्हा विशेष लेखापरिक्षक (जिल्हा स्तर) |
| उप/सहाय्यक निबंधक (तालुकास्तर) | तालूका लेखापरिक्षक (तालूका स्तर) |

**४.The norms set by it for the discharge of its functions**
**( स्वत:ची कार्य पार पाडण्यासाठी ठरविण्यांत आलेली मानके )**

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० व नियम १९६१

**५.The rules, regulations, instructions, manuals and record held by it of under its control or used by its employees for discharging its functions**
**( त्याच्याकडील असलेले किंवा त्याच्या नियंत्रणात असलेले किंवा त्याची कार्य पार पाडण्यासाठी त्याच्या कर्मचारी वर्गाकडून वापरण्यांत येणारे नियम, विनियम, सुचना, नियमपुस्तिका आणि अभिलेख)**

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० व नियम १९६१

**६. A statement of the categories of documents that are held by it or under its control (त्याच्याकडे असलेल्या किंवा त्याच्या नियंत्रणाखाली असलेल्या दस्तऐवजांच्या प्रवर्गाचे विवरण)**

**वर्गीकरण प्रकार A (कायम स्वरुपी ठेवावयाची कागदपत्रे )**

- सहकारी संस्थांची नोंदणी व पोटनियम नोंदणी धारीका
- विभागीय सुचना पुस्तिका (Manual)
- S.O.File (स्थायी आदेश धारिका)
- शासन निर्णय
- भौगोलिक बद आदेश
- कागदपत्रे वर्गीकरण यादी
- अभिलेख सूची
- निवाडा व डिक्री आदेश
- जडबस्तूसंग्रह नोंदवही
- GIS नोंदवही
- ग्रेडेशन लिस्ट
- बाजार क्षेत्र जाहीर करणे व शेतमाल वस्तुंचे नियमन आदेश
- म.स.सं.नियम १९६१ चे नियम ३० अनुसार सर्व कागदपत्रे
- सर्व वैधानिक आदेश
- आर्थिक प्रस्ताव
- नमुनेदार उपविधी
- नोंदणी क्रमांक वितरण

**वर्गीकरण प्रकार B ( ३५ वर्ष पर्यत ठेवावयाची कागदपत्रे )**

- लेखापरिक्षण अहवाल
- पोटनियम दुरुस्ती प्रकरणे
- कार्यक्रम अंदाजपत्रक पुस्तिका
- पेन्शन प्रकरणे
- जी.डी.सी.ए.निकालपत्रविभागीय परिक्षा निकालपत्र
- नियुंक्ती आदेश
- बदली आदेश व बढती आदेश
- आरक्षण आदेश

**वर्गीकरण प्रकार C ( ५ वर्षापर्यत ठेवावयाची कागदपत्रे)**

- सहकारी संस्थांचे वार्षिक अहवाल व लेखे
- शासन राजपत्र व अधिसुचना
- विधानसभा प्रश्न व उत्तरे/ विधान परिषद प्रश्न व उत्तरे,कपात सुचना,लक्षवेधी सुचना, आश्वासने
- प्रशासकीय आदेश
- कामकाज वाटप आदेश
- तपासणी अहवाल
- आवक जावक नोंदवही
- PRA/PRB (नियतकालीन विवरणपत्रे सादरीकरण नोंदवही)

**७. The particulars of any arrangement that exists for consultation with, or representation by, the members of the public in relation to the formulation of its policy or administration, thereof**
**(आपले धोरण तयार करण्याच्या किंवा त्याची अंमलबजावणी करण्याच्या संबंधात, लोकांशी विचार विनिमय करण्यासाठी किंवा लोकांकडूननिवेदने केली जाण्यासाठी अस्तित्वात असलेल्या व्यवस्थेचा तपशिल )**

प्राप्त झालेल्या धोरणात्मक बाबींवर सुचना तसेच कायद्यातील दुरुस्तीबाबतचे प्रस्ताव शासनास मान्यतेसाठी मा.सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था,महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे मार्फत सादर करण्यांत येतात. अंतिम मान्यता विधीमंडळाद्वारे होते.

**८.A statement of the boards, councils and other bodies- Minutes**
**(आपला एक भाग म्हणून किंवा सल्ला देण्याच्या प्रयोजनासाठी म्हणून घटीत केलेल्या दोन किंवा अधिक व्यक्तिंच्या मिळून बनलेल्या मंडळाचे, परिषदांचे, समित्यांचे आणि अन्य निकायांचे विवरण आणि त्या मंडळाच्या, परिषदांच्या समित्यांच्या आणि अन्य निकायांच्या बैठकी लोकांसाठी खुल्या आहेत किंवा कसे किंवा अशा बैठकीची कार्यवृत्ते जनतेला पहावयास मिळण्याजोगी आहेत किंवा कसे याबाबतचे विवरण)**

राज्यातील सर्व नागरी सहकारी बॅकांच्या लेखापरिक्षण कामकाजाचे संगणक प्रणाली द्वारे वाटप करण्यांत येते.

**९.A directory of officers and employees**
**(अधिका-यांची व कर्मचा-यांची निर्देशिका)**

विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था,लातूर कार्यालयातील दुरध्वनी क्रमांक
फोन क्र. ०२३८२-२५५१३५/२४३७९९ ई-मेल :- djr_ltr@rediffmail.com

| अ.क्र. | अधिकारी/कर्मचा-यांचे नाव | पदनाम | संपर्कासाठी दुरध्वनी क्रमांक /फॅक्स/ई-मेल |
|---|---|---|---|
| १ | श्री.एस.एस.देशमुख | विभागीय सहनिबंधक सह.संस्था | वरील प्रमाणे |
| २ | श्री.एम.ए.शेंदारकर | विभागीय सहाय्यक निबंधक | वरील प्रमाणे |
| ३ | श्री.ई.एम.मोरतळे | कार्यालय अधिक्षक | वरील प्रमाणे |
| ४ | श्री.एम.ए.खदीर | कार्यालय अधिक्षक | वरील प्रमाणे |
| ५ | रिक्त पद | लघूलेखक | वरील प्रमाणे |
| ६ | श्री.डी.बी.कांबळे | मुख्य लिपीक | वरील प्रमाणे |
| ७ | श्री.बी.बी.पवार | मुख्य लिपीक | वरील प्रमाणे |
| ८ | श्री.ए.व्ही.भोईबार | विभागीय मुल्य निरिक्षक | वरील प्रमाणे |
| ९ | श्रीमती.एस.व्ही.नरहरे | प्रतवारी पर्यवेक्षक | वरील प्रमाणे |
| १० | श्री एम डी म्हेत्रे | वरिष्ट लिपिक | वरील प्रमाणे |
| ११ | श्री. एन.पी.हाडूळे | वरिष्ट लिपीक | वरील प्रमाणे |
| १२ | श्री. एस.एस.शेख | वरिष्ट लिपीक | वरील प्रमाणे |
| १३ | श्री.आर.ए.चव्हाण | वरिष्ट लिपिक | वरील प्रमाणे |
| १४ | रिक्त पद | सहा.सह.अधिकारी | वरील प्रमाणे |
| १५ | श्रीमती.पी.आर.तिडके | वरिष्ठ लिपिक | वरील प्रमाणे |
| १६ | रिक्त पद | कनिष्ट लिपीक | वरील प्रमाणे |
| १७ | रिक्त पद | कनिष्ट लिपीक | वरील प्रमाणे |
| १८ | रिक्त पद | कनिष्ट लिपीक | वरील प्रमाणे |
| १९ | श्री.ई.एम.शेख | नाईक | वरील प्रमाणे |
| २० | रिक्त पद | शिपाई | वरील प्रमाणे |
| २१ | रिक्त पद | शिपाई | वरील प्रमाणे |
| २२ | रिक्त पद | शिपाई | वरील प्रमाणे |

१०.The **monthly remuneration received by each of officers and employees, including the system of compensation as provided in regulations.**

**(आपल्या प्रत्येक अधिका-याला व कर्मचा-याला मिळणारे मासिक वेतन तसेच प्राधिकरणाच्या विनियमामध्ये तरतूद केल्याप्रमाणे नुकसान भरपाई देण्याची पध्दती)**

**(माहे जुन,२०२१ अखेर)**

| अ.क्र. | नाव | पदनाम | मुळ वेतन | महागाई भत्ता | घरभाडे भत्ता | वाहतूक भत्ता | इतर (NPS) | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | श्री.एस.एस.देशमुख | विभागीय सहनिबंधक | १०८८०० | १८४९६ | ०० | ०० | ०० | १२७२९६ |
| २ | श्री.एम.ए.शेंदारकर | विभागीय सहाय्यक निबंधक | ६७१०० | ११४०७ | ५३६८ | ४०० | ०० | ८४२७५ |
| ३ | श्री.ई.एम.मोरतळे | कार्यालय अधिक्षक | ५३५०० | ९०९५ | ४२८० | ४०० | ०० | ६७२७५ |
| ४ | श्री.एम.ए.खदीर | कार्यालय अधिक्षक | ५५१०० | ९३६७ | ४४०८ | ४०० | ०० | ६९२७५ |
| ५ | श्री.डी.बी.कांबळे | मुख्य लिपीक | ४४९०० | ७६३३ | ३५९२ | ४०० | ७३५५ | ६३८८० |
| ६ | श्री.बी.बी.पवार | मुख्य लिपीक | ४११०० | ६९८७ | ३२८८ | ४०० | ६७३३ | ५८५०८ |
| ७ | श्री.ए.व्ही.भोईबार | विभागीय मुल्य निरिक्षक | ४११०० | ६९८७ | ३२८८ | ४०० | ६७३३ | ५८५०८ |
| ८ | श्रीमती.एस.व्ही.नरहरे | प्रतवारी पर्यवेक्षक | ३६५०० | ६२०५ | २९२० | ४०० | ६९७९ | ५२००४ |
| ९ | श्री एम डी म्हेत्रे | वरिष्ट लिपिक | २९६०० | ५०३२ | २३६८ | ४०० | ४८४९ | ४२२४९ |
| १० | श्री. एन.पी.हाडूळे | वरिष्ट लिपीक | २९६०० | ५०३२ | २३६८ | ४०० | ४८४९ | ४२२४९ |
| ११ | श्री. एस.एस.शेख | वरिष्ट लिपीक | २९६०० | ५०३२ | २३६८ | ४०० | ४८४९ | ४२२४९ |
| १२ | श्री.आर.ए.चव्हाण | वरिष्ट लिपिक | २७९०० | ४७४३ | २२३२ | ४०० | ४५७१ | ३९८४६ |
| १३ | श्रीमती.पी.आर.तिडके | वरिष्ठ लिपिक | २७१०० | ४६०७ | २१६८ | ४०० | ४४३९ | ३८७१४ |
| १४ | श्री.ई.एम.शेख | नाईक | ३२७०० | ५५५९ | २६१६ | ४०० | ५० | ४१३२५ |

११.The **budget allocated to each of its agency, indicating the particulars of all plans, proposed expenditures and reports on disbursements made.**

**( सर्व योजनांचा तपशिल, प्रस्तावीत खर्च दर्शविणारा, आपल्या प्रत्येक अभिकरणाला नेमुन दिलेला अर्थसंकल्प आणि सवितरीत केलेला रकमांचा अहवाल)**

**सन २०२०-२१ साठी लेखाशिर्षनिहाय या कार्यालयाचे अर्थसंकल्पीय वितरण प्रणालीवर वितरीत केलेली अर्थसंकल्पीय तरतूद माहे जुन,२०२१ अखेर पर्यत**

| अ.क्र. | लेखाशिर्ष | अर्थसंकल्पीय वितरण प्रणालीवर वितरीत केलेली रक्कम रु.हजारात |
|---|---|---|
| १ | २४२५००६७ | |
| | वेतन | ६९५९०५१ |
| | प्रवास | ० |
| | कार्यालयीन खर्च | ६५००० |
| | कार्यालय भाडे व कर | ४१०००० |
| | संगणक खर्च | ० |
| | मोटार वाहने | ० |
| | दुरध्वनी/लाईट /पाणी | ५०००० |
| | अतिकालीन भत्ता | ३०००० |
| २ | २४२५०४०५ | |
| | वेतन | २७८००० |
| | प्रवास | १००० |
| ३ | २४२५०३६१ | |
| | वेतन | १४४७६०० |
| | प्रवास | १०००० |
| | कार्यालयीन खर्च | ० |

**१२. The manner of execution of subsidy programmes, including amount allocated and the details of beneficiaries of such programmes**
**( अर्थसहाय्य कार्यक्रमाच्या अंमलबजावणीची रित तसेच वाटप केलेल्या रकमा आणि अशा कार्यक्रमांच्या लाभधारकांचा तपशिल)**

यासंबंधी माहिती उपलब्ध नाही

यावाबत आणि

**१३. Particulars of recipts of concessions, permits or authorizations granted by it**
**( ज्या व्यक्तींना सवलती, परवाने व प्राधिकारपत्रे दिलेली आहेत अशा व्यक्तींचा तपशिल सहकार आयुक्त कार्यालयामार्फत राबविण्यात येणा-या योजनांची माहिती)**

याबाबत, शासनामार्फत राबविण्यांत येणा-या योजनांची माहिती

| १ | **योजनेचे नाव** | **डॉ.पंजाबराव देशमुख व्याज सवलत योजना (सर्वसाधारण)** |
|---|---|---|
| | अ) योजना केव्हापासून कार्यान्वीत आहे | १९९१ |
| | ब) योजनेचा उद्देश व स्वरुप | रु.१०००००/- पर्यतचे अल्पमुदतीचे पीक कर्ज घेणा-या आणि विहीत मुदतीत परतफेड करणा-या शेतक-यांना ३ % वार्षिक दराने व रु.१०००००/- पेक्षा जास्त पण रु ३.०० लाखापर्यत अल्पमुदतीचे पीक कर्ज घेणा-या शेतक-यांना २% वार्षिक दराने व्याजाची सवलत लागू राहील सदर पीक कर्जाची संपूर्ण परतफेड ३० जूनच्या आत करणे आवश्यक आहे |
| | क) लाभार्थी | विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्थांचे, राष्ट्रीयकृत बॅकांचे, प्रादेशिक ग्रामीण बॅकांचे व खासगी बॅकांचे नियमित परतफेड करणारे कर्जदार तसेच या योजनेअंतर्गत अनुसुचित जाती व नवबौध्द कर्जदार सभासदांना विशेष घटक योजनेअंतर्गत उपरोक्त नमुद केल्याप्रमाणे लाभ देण्यात येतो |
| | ड) अर्ज कोणाकडे करावयाचा | सहाय्यक निबंधक/उपनिबंधक सहकारी संस्था |
| | इ) मंजूरीचे अधिकार | जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था |
| २ | **योजनंचे नाव** | **डॉ.पंजाबराव देशमुख व्याज सवलत योजना विघयो (जिल्हस्तरीय)** |
| | अ) योजना केव्हापासून कार्यान्वीत आहे | १९९१ |
| | ब) योजनेचा उद्देश व स्वरुप | सर्वसाधारण सभासदांप्रमाणे |
| | क) लाभार्थी | अनुसुचित जाती व नवबौध्द कर्जदार सभासद विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्थांचे, राष्ट्रीयकृत बॅकांचे, प्रादेशिक ग्रामीण बॅकांचे व खासगी बॅकांचे नियमित परतफेड करणोर कर्जदार तसेच या योजनेअंतर्गत, अनुसुचित जाती व नवबौध्द कर्जदारं सभासदांना विशेष घटक योजनेअंतर्गत उपरोक्त नमुद केल्याप्रमाणे लाभ देण्यात येता |
| | ड) अर्ज कोणाकडे करावयाचा | सहाय्यक निबंधक/उपनिबंधक सहकारी संस्था |
| | इ) मंजूरीचे अधिकार | जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था |
| ३ | **योजनेचे नाव** | **राज्यातील शेतक-यांना ६ % व्याज दराने अल्पमुदत पीक कर्ज पूरवठा करणे** |
| | अ) योजना केव्हापासून कार्यान्वीत आहे | सन २००६-०७ पासून |
| | ब) योजनेचा उद्देश व स्वरुप | राज्यातील शेतक-यांना ६ % व्याजदराने अल्पमुदती कर्ज पुरवठा होण्यासाठी जिल्हा मध्यवर्ती सहकारी बॅका, राष्ट्रीयकृत बॅका व |

| | | |
|---|---|---|
| | | प्रादेशिक ग्रामीण बॅकांना एक टक्का व्याज परतावा शासनाकडून देण्यात येतो. जिल्हा मध्यवर्ती सहकारी बॅकांना त्यांचेकडील अनुत्पादीत कर्जाचे (NPA) प्रमाण २० % पेक्षा कमी आहे. अशा बॅकांना १.२५ % दराने व्याज परतावा व ज्या जिल्हा मध्यवर्ती सहकारी बॅकांचे अनुत्पदीत कर्जाचे (NPA) २० % पेक्षा जास्त आहे अशा बॅकांना १.७५% दराने व्याज परतावा देण्यात येतो. त्याच प्रमाणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बॅकांनी स्वनिधीतुन केलेल्या पीक कर्ज पूरवठयावर १.७५% दराने व्याज परतावा देण्यात येतो. तथापी, नाबार्डकडून मिळणा-या पुर्नवित्त/कर्ज पुरवठयावर व्याज परतावा अनुज्ञेय नाही |
| | क) लाभार्थी | जिल्हा मध्यवर्ती सहकारी बॅका/ प्राथमिक कृषि पतसंस्था, राष्ट्रीयकृत बॅका व प्रादेशिक ग्रामीण बॅका |
| | ड) अर्ज कोणाकडे करावयाचा | १)जिल्हा मध्यवर्ती सहकारी बॅकांनी जिल्हा उपनिबंधक यांचकडे २) राष्ट्रीयकृत /प्रादेशिक ग्रामीण बॅकांनी बॅक शाखा ज्या तालुक्यात आहे त्या तालूका सहाय्यक/उपनिबंधक यांचेकडे |
| | इ) मंजूरीचे अधिकार | मा.सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था म.रा.पुणे |
| **४** | **योजनेचे नांव** | **उपसा जलसिंचन योजनांना अर्थसहाय्य** |
| | अ) योजना केव्हापासून कार्यान्वीत आहे | १९९४ |
| | ब) योजनेचा उद्देश व स्वरुप | सहकारी उपसा सिंचन संस्थामार्फत जास्तीत जास्त जमीन ओलिताखाली आण्यासाठी उपसा जलसिंचन योजनांना प्रकल्प खर्चाच्या एकूण २५% किंवा रु.१.०० लाख यापैकी जी रक्कम कमी असेल त्या रकमे इतके शासन सदर संस्थेस अनुदान मंजूर करते. राज्यातील सहकारी उपसा जलसिंचन योजनेच्या प्रकल्प खर्चामध्ये गेल्या काही वर्षात सातत्याने वाढ होत आहे व सदर प्रकल्पावर खर्च करणे आर्थिक दृष्टया सभासदांना अडचणीचे झाले आहे. सभासदांवरील खर्चाचा बोजा कमी करुन तो काही प्रमाणात शासनाने उचलण्यासाठी ही योजना कार्यान्वीत आहे. |
| | क) लाभार्थी | दिनांक १.४.१९९४ नंतर नोंदलेल्या सहकारी उपसा जलसिंचन संस्था व दि.१.४.९४ रोजी ज्या सहकारी उपसा जलसिंचन संस्थांची कर्जमागणी प्रकरणे वित्तीय संस्थांकडे प्रलंबित होती व ज्यांनी प्रकल्प उभारणीच्या कामास सुरुवात केली नव्हती अशा संस्था |
| | ड) अर्ज कोणाकडे करावयाचा | सहाय्यक निबंधक/ उपनिबंधक सहकारी संस्था |
| | इ) मंजूरीचे अधिकार | राज्य शासन |
| **५** | **योजनेचे नांव** | **प्राथमिक सहकारी कृषि पतसंस्था बळकटीकरणासाठी राष्ट्रीय कृषि विकास योजनेतंर्गत अर्थसहाय्याची सहकार संजिवनी योजना (प्राथमिक तत्वावर राबविणे) (PILOT BESIS)** |
| | अ) योजना केव्हापासून कार्यान्वीत आहे | वर्ष २०११-२०१२ |
| | ब) योजनेचा उद्देश व स्वरुप | १.प्रा.वैद्यनाथन समिती अंतर्गत अल्पमुदत सहकारी पतसंरचनेच्या (STCCS) बळकटीकरणासाठी राबविण्यांत आलेल्या पॅकेजचा लाभ मिळण्यासाठी राज्यातील अपात्र ठरविण्यात आलेल्या प्राथमिक |

| | | |
|---|---|---|
| | | सहकारी कृषि पतपुरवठा संस्थापैकी (PACS) विदर्भातील शेतकरी आत्महत्याग्रस्त अमरावती, अकोला, वाशिम, यवतमाळ, बूलढाणा व वर्धा या सहा जिल्हयात ८०२ संस्थांचे पुनर्जीवन/बळकटीकरण करण्यासाठी या संस्थांनी मागील वर्षीच्या तुलनेत चालू वर्षात मध्ये केलेले वाढीव कृषी कर्ज वाटप व मागील वर्षाचे तुलनेत चालू वर्ष केलेली कृषि कर्जाची वाढीव वसूली या पोटी संस्थांना प्रोत्साहनपर आर्थिक अनुदान व या संस्थांचे सचिवांना उत्तेजनार्थ रोख रकमेच्या स्वरुपात बक्षिस देण्यात येते या योजनेस सहकार संजिवनी योजना असे संबोधण्यात येत आहे.<br>२.या योजनेत वैद्यनाथन पॅकेजसाठी विदर्भातील अमरावती (४२०), अकोला/वाशिम (५१), बुलढाणा (६०), यवतमाळ (१२९), व वर्धा (१४२) या शेतकरी आत्महत्याग्रस्त सहा जिल्हयातील राज्यस्तरीय मंजूरी समितीने (SLIC) अपात्र ठरवलेल्या संस्थांचा समावेश आहे.<br>३.ही योजना चालू वर्षात मागील वर्षीच्या कर्जवाटपाच्या तुलनेत केलेल्या वाढीव कृषी कर्ज वाटप व संस्थेच्या येणे कृषि कर्जापोटी मागणील वर्षाच्या तुलनेत चालू वर्षी ( दि.३० जून पर्यत) करण्यात आलेली वाढीव वसूली या पोटी संबंधीत संस्थेला वर्ष अखेरीस प्रोत्साहरपर आर्थिक अनुदान देण्यात येणार आहे. याच पध्दतीने योजना पूढील कालावधीत राबविण्यात येईल.<br>४.प्रत्येक संस्थेला प्रतिवर्षी संस्थेने केलेल्या वाढीव कृषि कर्ज वाटपाच्या रकमेच्या २% किंवा अधिकतम रु.५००००/- यापैकी जी रक्कम कमी असेल ती रक्कम प्रोत्साहनपर अनुदान स्वरुपात देण्यात येणार आहे.<br>५..प्रत्येक संस्थेला प्रतिवर्षी संस्थेने केलेल्या वाढीव कृषि कर्ज वसूली रकमेच्या २% किंवा अधिकतम रु.५००००/- यापैकी जी रक्कम कमी असेल ती रक्कम प्रोत्साहनपर अनुदान स्वरुपात देण्यात येणार आहे.<br>६.प्रत्येक संस्थेच्या सचिवाला त्याने उपरोक्त कालावधीत संस्थेचे वाढीव कृषि कर्ज वाटप व जुन अखेर केलेली वाढीव कर्ज वसूलीसाठी दिलेल्या योगदानापोटी संस्थेला वाढीव कर्ज वाटप व वाढीव कर्ज वसूलीपोटी संबंधीत वर्षात मिळालेल्या एकूण अनुदानाच्या १०% किंवा अधिकतम रु.१००००/- प्रतिवर्ष, प्रतिसंस्था यापैकी जी रक्कम कमी असेल ती रक्कम उत्तेजनार्थ बक्षीस म्हणून देण्यात येणार आहे. |
| | क) लाभार्थी | विदर्भातील अमरावती, अकोला, वाशिम, बूलढाणा, यवतमाळ व वर्धा जिल्हयातील प्राथमिक सहकारी कृषि पतसंस्था व या संस्थांचे गटसचिव |
| | ड) अर्ज कोणाकडे करावयाचा | सहाय्यक निबंधक/उपनिबंधक सहकारी संस्था |
| | इ) मंजूरीचे अधिकार | विभागीय सहनिबंधक |
| **६** | **योजनेचे नाव** | **महाराष्ट्र सहकार विकास महामंडळाला भागभांडवली अंशदान** |

| | | |
|---|---|---|
| | अ) योजना केव्हापासून कार्यान्वीत आहे | १९९९-२००० |
| | ब) योजनेचा उद्देश व स्वरुप | सहकारी साखर कारखाने, सुतगिरण्या व अन्य मोठया सहकारी संस्थांना भागभांडवल, कर्ज देण्यासाठी शासनाकडून पुरेसा निधी उपलब्ध होऊ शकत नाही म्हणून महाराष्ट्र सहकार विकास महामंडळाची स्थापना करण्यात आली असून या महामंडळामार्फत बाजारातुन कर्ज व कर्जरोखे उभारुन अर्थबळ निर्माण केले जाते व त्यातुन वरील संस्थांना आवश्यकतेनुसार भागभांडवल व कर्ज मंजूर करण्यासाठी शासनाला कर्ज रुपाने निधी उपलब्ध करुन दिला जातो. महामंडळाचे सदर कार्य व्यवस्थितपणे चालण्यासाठी महामंडळाला प्रतिवर्षी शासन भाग भांडवल देण्यात येते महामंडळाचे अधिकृत भाग भांडवल रु.१०० कोटी असून त्यापैकी ५१ % भाग भांडवल राज्य शासनाकडून उपलब्ध करुन देण्यासाठी सदर योजनेतंतर्गत महामंडळास भाग भांडवल देण्यात येते. |
| | क) मंजूरीचे अधिकार | मा.सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था,म.रा.पुणे |
| ७ | **योजनेचे नाव** | **औद्योगिक सहकारी संस्थांना भागभांडवली अंशदान** |
| | अ) योजना केव्हापासून कार्यान्वीत आहे | १९७४ |
| | ब) योजनेचा उद्देश व स्वरुप | औद्योगिक संस्थांना आपला आर्थिक पाया मजबूत करण्यासाठी व त्यांच्या अडचणी निवारण्या करीता महाराष्ट्र शासन १:३ प्रमाणात भाग भांडवल देते. औद्योगिक सहकारी संस्थांना वित्तीय संस्थांकडून आवश्यक प्रमाणात कर्ज उभारण्याची पात्रता वाढविण्यासाठी ही योजना कार्यान्वीत आहे. सदर योजनेमध्ये प्रकल्प किमतीच्या ६० % वित्तीय संस्थेचे कर्ज, १०% संस्थेचे भाग भांडवल आणि ३०% शासनाचे भाग भांडवल असे आर्थिक सहाय्याचे स्वरुप आहे आणि सदरचे भाग भांडवल परतफेड १५ वर्षामध्ये करावयाची आहे. |
| | क) लाभार्थी | औद्योगिक सहकारी संस्था |
| | ड) अर्ज कोणाकडे करावयाचा | सहाय्यक/ उपनिबंधक, सहकारी संस्था |
| | इ) मंजूरीचे अधिकार | राज्य शासन |
| ८ | **योजनेचे नाव** | **औद्योगिक सहकारी संस्थांना भाग भांडवली अंशदान** |
| | अ) योजना केव्हापासून कार्यान्वीत आहे | १९७२-७३ |
| | ब) योजनेचा उद्देश व स्वरुप | ग्रामीण भागातील बलूतेदारांनी उत्पादीत केलेल्या मालाची विक्री करणे व बलूतेदारांना तांत्रिक/व्यावसायीक सल्ला देणे व मार्गदर्शन करणे यासाठी बलूतेदारांच्या औद्योगिक सहकारी संस्था तालूका पातळीवर स्थापन करण्यांत आलेल्या आहेत या संस्थांना १:२ प्रमाणात शासकीय भागभांडवल देण्यांत येते. बलूतेदारांच्या सहकारी संस्थांचा भाग भांडवली पाया मजबूत करणे व त्यायोगे बलूतेदारांना स्वंयरोजगारासाठी प्रोत्साहीत करुन त्यांच्या उत्पन्नात वाढ करणे आवश्यक आहे. |
| | क) लाभार्थी | बलूतेदार सहकारी संस्था |
| | ड) अर्ज कोणाकडे | सहाय्यक निबंधक/जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था |

| | | |
|---|---|---|
| | करावयाचा | |
| | इ) मंजूरीचे अधिकार | जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था |
| ९ | **योजनेचे नाव** | **महिला सहकारी संस्थांना अर्थसहाय्य (केंद्र पुरस्कृत)** |
| | अ) योजना केव्हापासून कार्यान्वीत आहे | १९९३-९४ |
| | ब) योजनेचा उद्देश व स्वरुप | १००% अर्थसहाय्य केंद्र शासनाकडून उपलब्ध होते संस्थांचे प्रस्ताव शिफारस करण्यासाठी जिल्हाधिकारी पातळीवर एक समिती नियुक्त केलेली आहे. महिलांच्या प्राथमिक सहकारी संस्थांना खालील प्रमाणे कमाल रु.१ लाखापर्यंत अर्थसहाय्य उपलब्ध करुन देण्यात येत.<br>१)शासकीय भागभांडवल रु.४००००/- २)खेळते भांडवल रु.४००००/- ३) व्यवस्थापकीय अनुदान रु.२००००/-<br>राज्यातील महिला सहकारी संस्थांचा आर्थिक विकास होण्यासाठी तसेच त्यांना स्वत:च्या पायावर उभे राहता यावे म्हणून अशा संस्थांना अर्थसहाय्य मंजूर करण्याची योजना केंद्र शासनाने सुरु केलेली आहे. |
| | क) लाभार्थी | महिला सहकारी संस्था |
| | ड) अर्ज कोणाकडे करावयाचा | जिल्हा उपनिबंधक,सहकारी संस्था |
| | इ) मंजूरीचे अधिकार | राज्य शासन |
| १० | योजनेचे नांव | दुर्बल घटकातील सहकारी संस्थांना अर्थसहाय्य |
| | अ) योजना केव्हापासून कार्यान्वीत आहे | १९९३-९४ |
| | ब) योजनेचा उद्देश व स्वरुप | **रुपये लाखात** (see table below) |

**रुपये लाखात**

| अ.क्र. | तपशिल | भाग भांडवल रुपये | खेळते भा.भां.रु | अनुदान रुपये | एकूण |
|---|---|---|---|---|---|
| १ | प्रा.सह.संस्था | ०.४० | ०.४० | ०.२० | १.०० |
| २ | जिल्हास्तरीय संख | ०.८० | ०.८० | ०.४० | २.०० |
| ३ | राज्यस्तरीय संख | २.०० | २.०० | १.०० | ५.०० |

| | | |
|---|---|---|
| | क) लाभार्थी | दुर्बल घटकांच्या सहकारी संस्था |
| | ड) प्रतफेडीचा कालावधी | भागभांडवल १५ वर्ष (तीन वर्षाचा मॉर्टोरिअम ) १२ समाने हप्ते<br>खेळते भांडवल ९ वर्ष (दोन वर्षाचा मॉर्टोरिअम )७ समान हप्ते |
| | इ) अर्ज कोणाकडे करावयाचा | जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था |
| | ई) मंजूरीचे अधिकार | राज्य शासन |

**१४.Details in respect of the information, available to or held it, reduced in an electronic form**

**( इलेक्ट्रॉनिक स्वरुपात त्यास उपलब्ध असलेल्या किंवा त्याच्याकडे असलेल्या माहितीच्या संबंधातील तपशिल)**

या करीता नेमलेले जनमाहिती अधिकारी, आणि

१५. **The particulars of facilities available to citizens for obtaining information, including the working hours or a library or reading room, if maintained for public use.**
**( माहिती मिळविण्यासाठी नागरिकांना उपलब्ध असणा-या सुविधांचा तपशिल, तसेच सार्वजनिक वापरासाठी चालविण्यांत येत असलेल्या ग्रंथालयाच्या किंवा वाचनालयाच्या कामकाजाच्या वेळांचा तपशिल)**

या करीता नेमलेले जनमाहिती अधिकारी, आणि

१६. **The names, designations and other particulars of the Public Information Officers**
**( जन माहिती अधिका-यांची नांवे, पदनामे आणि इतर तपशिल)**

| कार्यालय | सहाय्यक माहिती अधिकारी | | शासकीय माहिती अधिकारी | प्रथम अपिलीय अधिकारी |
|---|---|---|---|---|
| | कर्मचा-यांचे नाव व पदनाम | विभाग | | |
| विभागीय सहनिबंधक सहकारी संस्था, (प्रशासन) लातूर | श्री.बी.बी.पवार मुख्य लिपीक | अपिल | श्री.ई.एम.मोरतळे कार्यालय अधिक्षक | श्री.ए.एम.शेदारकर , विभागीय सहाय्यक निबंधक |
| | श्री.आर.ए.चव्हाण, वरिष्ट लिपीक | प्रशासन | | |
| | श्रीमती.एस.व्ही.नरहरे, प्रतवारी पर्यवेक्षक | अर्थ-1 | | |
| | रिक्त पद | अर्थ-3 | | |
| | श्री.एम.डी.म्हेत्रे, वरिष्ट लिपीक | आस्थापना-1 | | |
| | श्रीमती पी.आर.तिडके वरीष्ट लिपीक | आस्थापना-2 | | |
| | श्री.डी.बी.कांबळे, मुख्य लिपीक | अर्थ-2 | श्री.एम.ए.खदीर कार्यालय अधिक्षक | |
| | श्री.ए.व्ही.भोईबार,विभागीय मुल्यनिरिक्षक | पणन | | |
| | श्री.एस.एस.शेख, वरिष्ट लिपीक | सामान्य/लेखा | | |
| | श्री.एन.पी.हाडूळे, वरिष्ट लिपीक | नियोजन | | |
| | रिक्त | औद्योगिक | | |

१७. **Such other information as may be prescribed**
**( विहीत करण्यात येईल अशी माहिती )**

**(श्रीकांत देशमुख)**
**विभागीय सहनिबंधक,**
**सहकारी संस्था,लातूर**